साहसे श्रीः प्रतिवसति ।

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे

# अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

नॅक मानांकन B++

ता. अकोले (४२२ ६०१), जि. अहमदनगर






# अगस्त्य

२०११-१२

संपादक
प्रा.डॉ.सौ. अकीला शेख

प्रकाशक
प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

## आम्हाला आपला सार्थ अभिमान आहे.

**माजी विद्यार्थी-प्रा.डॉ.अशोक चासकर**

अधिष्ठाता, कला व ललित कला शाखा ,पुणे विद्यापीठ

सदस्य- व्यवस्थापन परिषद



## दोन मिनिटांसाठी जबरदस्तीने डोळे मिटून बघा, अंधाराचे विश्व कसे असते ते !

**चेतन उचितकर**



साहसे श्री प्रतिवसति ।

स्थापना
१/७/१९७४

नॅक मानांकन
B++

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,

# अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

ता. अकोले, जि. अहमदनगर

पिन - ४२२ ६०१
( दूरध्वनी : ०२४२४-२२१२४८ )

# ॥ अगस्त्य ॥

नियतकालिक
२०११-१२

■■■

• प्रकाशक •
प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

• संपादक •
प्रा.डॉ.सौ. अकीला शेख

■ **प्रकाशक-**

**प्राचार्य रमेशचंद्र खांडगे**

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते
विज्ञान महाविद्यालय,
अकोले, जि. अहमदनगर

■ **संपादक-**

**प्रा.डॉ.सौ. अकीला शेख**

■ **संपादक मंडळ-**

प्रा. संजय पगारे
प्रा. सुनील घनकुटे
प्रा. विवेक वाकचौरे
प्रा. रोहिणी डावरे

■ **विशेष सहाय्य-**

प्रा. डॉ. विजय बाणकर
प्रा. अविनाश झांबरे
प्रा. सौ. महेजबीन सय्यद
प्रा. डॉ. सुनील शिंदे
प्रा. जी. डी. लांडगे
प्रा. बाळासाहेब शेटे
प्रा. ओंकार राठी
प्रा. के. एस. गुंजाळ
श्री. चंद्रभान ढवळे

■ **मुखपृष्ठ व मलपृष्ठ संकल्पना-**

श्री. सुजित गुलाब नवले
प्रा. सुनील घनकुटे

■ **अक्षर जुळणी, फोटोसेटींग-**

श्री. सचिन गुलाब नवले

■ **मुद्रण-**

सुजाता ऑफसेट, अकोले/राजूर
(०२४२४) २२१३३१,२२१३३२


## वार्षिक नियतकालिक

२०११-१२


दि प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स् , नियम ८ फॉर्म ४
प्रमाणे आवश्यक माहिती

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : | अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर. |
| **प्रकाशन काळ** | : | वार्षिक |
| **प्रकाशक** | : | प्राचार्य रमेशचंद्र खांडगे |
| **पत्ता** | : | अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर. |
| **संपादकाचे नांव** | : | प्रा.डॉ.सौ. अकीला शेख |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **मालकी** | : | अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर. |

मी प्रा. रमेशचंद्र खांडगे जाहीर करतो की,
वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे
प्रकाशक



■ ■ ■

सदर अंकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या साहित्यातील मतांशी संपादक मंडळ व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

न उमललेल्या कळ्यांना

?

- ग्रामीण प्रतिभेला फुलविणारा
- सौंदर्यात्मकता, कलात्मकता व निर्मितीशीलता
- महाविद्यालयातील प्रगतीचा आलेख
- अंतरंगातील व्यापकता
- 'एक वाटाड्या'




## मुखपृष्ठ संकल्पना

''नूर हैं आँखों का, दिल की तसल्ली हैं बेटियाँ
जिंदगी की जिंदगी को जग में आने दीजिए
बेटियों के भ्रूण की हत्या से बढकर पाप क्या
दो घरों की रोशनी को जग में आने दीजिए।।''

स्त्री भ्रूण हत्या विरोधी चळवळीसाठी सर्वांची भूमिका आज आणि उद्याही महत्त्वाची ठरणार आहे. देशपातळीवर विधेयक कायद्यात रूपांतर केले गेले आहे. तरीपण स्त्रीभ्रूण हत्या होताना पाहिल्यावर व्यक्तीच्या शारीरिक, मानसिकतेला बाधा पोहचेल अशा प्रकारचे हीनतेचे प्रकार आजही मोठ्या प्रमाणात होत आहेत. अशा बऱ्याच घटना या वर्षी घडलेल्या आहेत. या पार्श्वभूमिवर मुखपृष्ठ साकार करून यावर अधिक प्रकाश टाकण्याचा विनम्र प्रयत्न केला आहे.

अनुक्रम

२०११-२०१२



## प्राचार्यांचे मनोगत

श्री

Turning and turning in the widening Gyre
The Falcon can not hear the falconer
Things fall Apart, Centre can not hold
Mere Anarchy has been loosed upon the world
- The Second Coming
- **W. B. Yeats.**

''आजकाल विद्यार्थ्यांमध्ये बेशिस्तीचे व अनीतीचे प्रमाण वाढत चालले आहे. आताशा त्यांची पावले मुलींच्या वसतीगृहाकडे मोठ्या प्रमाणात वळू लागली आहेत.''

**– चार्वाक .**

वरील दोन अवतरणे मुद्दाम त्यांच्या निर्मात्यांच्या नावांसह दिलेली आहेत. जर ती नांवे न देता फक्त अवतरणे दिली असती, तर आजच्या परिस्थितीचे यथार्थ वर्णन करणारी म्हणून सहज खपून गेली असती; तात्पर्य जगातील आजची अराजकाची परिस्थिती अथवा शिक्षणक्षेत्रातील विविध प्रश्न हे आजकालचे नाहीत तर अनादिकाळापासूनच चालत आले आहेत. काळानुसार त्यांच्या स्वरूपात बदल होतात. आपापल्या कुवतीनुसार तत्कालीन समाज त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करतो. मत्त हत्तीच्या झुंजीत गवत तुडवले जाते तसे काही निष्पाप जीव तुडवले जातात आणि समर्थांच्या भाषेत 'जनांचा प्रवाहो चालला' म्हणजे जनजीवन सुरळीत चालू राहते.

महाविद्यालयाच्या नियतकालिकाच्या मनोगतात हे काय लिहिले आहे, असेही काहींना वाटण्याची शक्यता आहे. महाविद्यालयाचे ज्या वर्षी नॅक मूल्यांकन झाले त्या वर्षी तज्ज्ञांनी अहवालात 'या महाविद्यालयामध्ये आपल्या आजूबाजूच्या समूहास दिशा देण्याची क्षमता आहे' असे गौरवोद्‌गार काढले होते. यातच महाविद्यालयाचे वेगळेपण आहे.

चार भिंतींच्या आतील माहितीचे आदान प्रदान एवढे सीमित ध्येय या महाविद्यालयाने कधीच पाहिले नाही. संस्था निर्मिती करतांना संस्थापकांनी मनाशी बाळगलेली अपेक्षा, केवळ पदवी देणारे केंद्र नव्हे. तर आपल्या भोवतालच्या समस्यांना सामोरे जाऊन, प्रसंगी कवेत घेवून, समस्यांना समोरासमोर भिडणारे नवयुवक निर्माण करणे हे होते. सांगण्यास अभिमान जरुर वाटतो की, गेल्या ३८ वर्षात महाविद्यालयाने त्या दिशेने भरीव वाटचाल केली आहे. तालुक्याच्या प्रत्येक घटकाला हे महाविद्यालयआपुलकीचे, हक्काचे, प्रसंगी भांडण करून आपले प्रश्न सोडविण्याचे केंद्र वाटते. हे सर्वांत मोठे यश आहे. सुसज्ज इमारती, ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, वनस्पती उद्यान, क्रीडांगणे, अभ्यासेतर व पूरक उपक्रम, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र, स्पर्धा परीक्षा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, 'कर्मवीर भाऊराव पाटील' कमवा व शिका योजना, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय कॉपीमुक्त परीक्षा, कमकुवत विद्यार्थी घटकांसाठी खास प्रशिक्षण आदि सर्व सुविधा, त्यातच कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गांचे पदव्युत्तर ९ अभ्यासक्रम आणि या वर्षापासून भूगोल विभागाचे संशोधन केंद्र आणि शिस्तबद्ध ४५०० विद्यार्थी-विद्यार्थिनी या सर्व घटकांनी नटलेले हे महाविद्यालय आहे. महत्त्वाचा भाग म्हणजे दरवर्षी स्नेहसंमेलनाप्रसंगी सहा दिवस विविध उपक्रम, आणि आगळावेगळा पाहुणा यामुळे 'आनंदोत्सव' साजरा होत असतो. या वर्षाचा पाहुणा चि. चेतन उचितकर या अंध मुलाने तर सर्व डोळसांच्या डोळ्यात अंजन घातले. त्यापासून प्रेरणा घेवून माझ्यासह २ सहकारी, एक कार्यकारिणी सदस्य, विद्यार्थी व १५ विद्यार्थिनींनी नेत्रदान व देहदानाचा संकल्प जाहीर केला. त्यामुळेच 'हटके' महाविद्यालय म्हणून आपले महाविद्यालय प्रसिद्ध आहे.

त्यामुळेच जाणीवपूर्वक सुरवातीस वर्णन केलेली परिस्थिती आम्हाला नवीन नाही. कितीही संकटे, वादळे येवोत, आमची विजिगीषु वृत्ती थांबणार नाही हीच आमची जिद्द आहे.

दरवर्षीप्रमाणे अंतरंगात अनेक नवीन उपक्रम दिसतील. कला, क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक यशोमालिका दिसतील. या सर्वांचे श्रेय माझ्या भगिनी डॉ.सौ. अकीला शेख व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे आहे. त्यांचे परिश्रम, नवनवीन शोधण्याची व सर्वोत्तम तेच देण्याची त्यांची जिद्द वाखाणण्यासारखी आहे. प्रा. सुनिल घनकुटे यांचेही विशेषत्वाने नांव घ्यायला हवे, शेवटी मुखपृष्ठाविषयी! ते स्वयंस्पष्ट आहे. त्यातील आर्त वेदना खरी आहे.

पण हे सर्व कृतीत यायला हवे. आमच्या महाविद्यालयात ५०% विद्यार्थिनी आहेत. सुमारे २२०० विद्यार्थी व २२०० विद्यार्थिनी असे प्रमाण आहे. तुमच्या गावात ही समानता कधी येणार ?

– प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

## संपादकीय...



सर्वांना प्रिय असलेले 'अगस्त्य' आपल्या हाती देताना एक आगळा वेगळा आंनद होत आहे. यासाठी की नियतकालिकाचे महर्षि अगस्तिंच्या नांवे 'अगस्त्य' हे नामकरण करतांना तत्कालीन अंकाचे (२००२-२००३) संपादन माझेकडे होते आणि या शैक्षणिक वर्षाचे संपादनही योगायोगाने माझेकडे आले. या नियतकालिकाची सौंदर्यात्मकता, कलात्मकता, निर्मितीशीलता व अंतरंगातील व्यापकता यामुळे यास 'एक वाटाड्या' म्हणून दरवर्षी प्रसिद्धी मिळत आहे. दरम्यानच्या काळात 'अगस्त्य'ला पुणे विद्यापीठाच्या वतीने वेळोवेळी गौरविण्यात आल्याचा विशेष आनंद आपणा सर्वांनाच आहे !

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त मा.आमदार मधुकररावजी पिचड साहेब, विश्वस्त मंडळ, अध्यक्ष मा.श्री.जे.डी. आंबरे पाटील, सेक्रेटरी मा.श्री. यशवंतराव आभाळे व कार्यकारिणी सदस्य यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन यामुळे महाविद्यालयाला गरूड भरारी घेणे शक्य झाले आहे.

मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन व नेतृत्वगुण यामुळे अशी उत्तुंग गरूड झेप, नियतकालिकाच्या गौरवानिमित्ताने घेताना अपार समाधान होत आहे. नियतकालिकाचा दर्जा आपण सुरवातीपासूनच टिकविला आहे हे येथे आवर्जून नमूद करायला हवे.

प्रतिवर्षी येणारे नियतकालिक हे नवीन रंग-रूपात नवीन सुगंधाने बेहोश करीत नव्या तरुणाईला वाव आणि प्रेरणा देणारे असते. उसळत्या तरुणाईच्या ग्रामीण प्रतिभेला फुलविण्याची व आविष्कृत करण्याची जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. 'अगस्त्य'ची साहित्य व संस्कृतीविषयक प्रगल्भ जाण आणि महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता कायमच चर्चेत राहिली आहे.

''हंसः श्वेतः बकः श्वेतः को भेदो बकहंसयो: ।
नीरक्षीर विवेके तु हंसो हंसो बकोबकः।।''

या सुभाषिताच्या आशयाप्रमाणे नीरक्षीर न्यायाने हंसासारखी वृत्ती टिकवून दूध आणि पाण्यातील फरक जाणण्याइतपत पुरेसे चांगले कार्य 'अगस्त्य'च्या संपादनानिमित्ताने आपण करीत आहोत, हे मी नम्रपणे सांगू इच्छिते...!

महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाणांचे हे जन्मशताब्दी वर्ष!, स्त्री-भ्रूण-हत्या, महागाईचा भस्मासूर, भ्रष्टाचार, साहित्य, समीक्षा, प्रेम अशी विविधांगी लेखनशैली, महाविद्यालयीन अभ्यासेतर उपक्रम, विविध अहवाल या सर्वांचा वेध या अंकातून घेतला आहे.


संपादक मंडळ, सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, मोलाचे सहकार्य करणारे मुद्रक-सुजाता ऑफसेट प्रिंटर्सचे प्रोप्रा. सुजित नवले, अक्षर रचनाकार श्री. सचिन नवले या सर्वांच्या एकत्रित परिश्रमाने व सहकार्याने 'जे-जे उत्तम, उदात्त, उन्नत' ते आणि तेवढेच देण्याचा हा प्रयत्न आहे. ह्या सर्वांना मौन धन्यवाद देणेच सुखद वाटते.

या वर्षी पावसाने फार-फार ओढ दिली आहे. कष्टकरी बळीराजापासून सारेच अस्वस्थ आहेत. सामान्यांपासून गुरा-वासरांची मूक वेदना आणि म्हणूनच वेदनेपासून आपण ही अलिप्त राहू शकत नाही. तरी ही या संपादकीयाची अखेर करताना प्रख्यात रान कवी ना. धो. महानोर यांच्या मार्मिक अन् भेदक ओळी स्मरतात -

''या नभाने या भुईला दान द्यावे
आणि माझ्या पापण्यांना पूर यावे!''

**- प्रा.डॉ. अकीला शेख**
संपादक, 'अगस्त्य'

# विश्वस्त मंडळ, अ.ता.ए.सोसायटी




मा. आमदार मधुकरराव पिचड

कार्यकारी विश्वस्त



मा. लालचंदजी शहा

विश्वस्त



मा. भाऊसाहेब हांडे

विश्वस्त



मा. दशरथ पा. सावंत

विश्वस्त



मा. प्रेमानंद रुपवते

विश्वस्त



मा. डॉ. बी. जी. बंगाळ

विश्वस्त



मा. सिताराम पा. गायकर

विश्वस्त

# अ.ता.ए. संस्थेची विद्यमान कार्यकारिणी



मा.श्री. जे. डी. आंबरे पाटील
अध्यक्ष



मा. ॲड. श्री. वसंतराव मनकर
उपाध्यक्ष



मा.श्री. यशवंतराव आभाळे
सेक्रेटरी



मा.श्री.डॉ. डी. के. सहाणे
सह सेक्रेटरी



मा. ॲड. श्री. के. बी. हांडे
खजिनदार



मा. श्री. मीनानाथ पांडे
विस्तार प्रमुख



मा. श्री. हामीद फारूकी
सदस्य



मा. श्री. मधुकरराव सोनवणे
सदस्य



मा.श्री. अशोकराव भांगरे
सदस्य



मा. ॲड. आनंदराव नवले
सदस्य



मा.श्री. सुधाकरराव देशमुख
सदस्य



मा.श्री. पुंजा आवारी पाटील
सदस्य



मा.श्री. निवृत्ती साबळे
सदस्य



मा.श्री. धनंजय संत
सदस्य



मा.सौ. कल्पनाताई सुरपुरिया
सदस्या



मा. सौ. आशाताई पापळ
सदस्या

प्राचार्य



**प्रा. रमेशचंद्र खांडगे**

उपप्राचार्य–कनिष्ठ महाविद्यालय



**प्रा. आत्माराम काळे**

पर्यवेक्षक –कनिष्ठ महाविद्यालय



**प्रा.डॉ. भास्करराव खांडगे**
(दि. ३१ जानेवारी २०१२ पर्यंत )

पर्यवेक्षक–कनिष्ठ महाविद्यालय



**प्रा. सखाराम चासकर**
(दि. १ फेब्रुवारी २०१२ पासून )

कार्यालयीन अधिक्षक



**श्री. चंद्रभान ढवळे**

# आगळा वेगळा पाहुणा

## चेतन उचितकर



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी स्वागत करताना महाविद्यालयीन विद्यार्थिनी



### आभार पत्र

चि. चेतन गंगासागरताई उचितकर
ब्रँड ॲम्बॅसिडर

(जिल्हा नेत्रदान प्रचार समिती वाशीम सक्षम
(अंध पुनर्वसन केंद्र जिल्हा प्रमुख, वाशीम)
ग्रामविकास समितीसदस्य केकतउमरा
अमरावती प्रयास, सेवांकुर सदस्य

**नेत्रदान सर्वश्रेष्ठ दान**

प्रति,
आदरणीय प्राचार्य खांडगे सरांना
स्नेह चरण स्पर्श

आपण आदरपूर्वक पाठविलेली स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाची पत्रिका माझ्यासारख्या अंध व गरीब घराण्यातील मुलांला पाठवून माझा जो सत्कार केला त्या बद्दल आपला मी आभारी आहे.

आपण माझ्यासारख्या अंध मुलाला बोलावून माझा आत्मविश्वास वाढविला मला समाजासाठी काम करण्याची चालना दिली त्याबद्दल, आपले हार्दिक आभार !

आपल्या कॉलेजच्या परिसरातील माझ्या आगमनानंतर माझे ज्या पद्धतीने स्वागत केले सर, ते मी कधीच विसरू शकत नाही. मी तर बघु शकत नाही पण ऐकू शकतो यावरूनच आपले कॉलेज मी पाहिले व अनुभवले सुद्धा ! फार प्रशस्त व चांगले वाटले.

आपल्या अशा कार्यास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

टीप : कामाच्या व्यस्ततेमुळे आभारपत्र पाठविण्यास विलंब झाला त्याबद्दल क्षमस्व.

दिनांक : २७/०३/२०१२

चेतन उचितकर